स्थायी समिति
दाखल विषय – दि. ६/९/२०१६

विषय क्रमांक :- ११९८ त्वर्य

प्रभाग क्र. ९ अ मध्ये भारतीय अनुसंधान केंद्र कृषी विभाग ते लक्ष्मण पार्क पर्यंत पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नबीलाल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,५२८/- पेक्षा १०.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८९,७९,५७६=१४ पर्यंत अधिक भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार होणारी रक्कम आदा/वसूल करुन येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/४८४ दि. २/९/२०१६ चे पत्र.

विषय क्रमांक :- ११९९ त्वर्य

प्रभाग क्रमांक २० अ मधील पुणे महानगरपालिकेच्या कै.सखाराम कुंडलीक कोद्रे हॉस्पिटलसाठी एक्स-रे मशिन विथ कॉम्प्युटेड रेडिओग्राफी सिस्टिम खरेदी करणे ( टेंडर क्रमांक ३० सन २०१६-१७ ) (बी-२ पध्दतीने) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक **मे.चित्रा सेल्स ॲन्ड सर्व्हिस** यांचेकडून X – Ray machine with Computed Radiography System ( A.C.1 Ton, Chest stand,Lead Apron – 2 Nos. Electrification for machine installation, Chairs – 2 Nos.Table – 1 No.Trolley for C.R.- 2 kva UPS – 1 No. Civil work for installation of X- Ray Machine ( As Per A.E.R.B. Norms ) इत्यादी बाबींसह प्रती नगाप्रमाणे रक्कम रूपये २९,७३,७२३/- (अक्षरी रक्कम रूपये एकोणतीस लाख त्र्याहत्तर हजार सातशे तेवीस फक्त ) पर्यंत प्रभाग क्रमांक २० अ मधील पुणे महानगरपालिकेच्या कै.सखाराम कुंडलीक कोद्रे हॉस्पिटलसाठी एक्स-रे मशिन विथ कॉम्प्युटेड रेडिओग्राफी सिस्टिम खरेदी करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करण्यास आणि खाली नमुद केलेल्या दोन अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४८९ दि. ३/९/२०१६ चे पत्र.

१) अर्थशिर्षक सन २०१६-१७, **CE 17 A 244 /SJ8-2, प्रभाग क्रमांक २० अ मधील कै.सखाराम कुंडलीक कोद्रे हॉस्पिटलमध्ये एक्स-रे मशिन व कॉम्प्युटेड रेडियोग्राफी सिस्टिम समवेत खरेदी करणे. मान्य तरतूद रक्कम रूपये २५,५०,००० /-**
२) अर्थशिर्षक सन २०१६-१७, **CE 17 A 217, शहरातील इतर सर्व दवाखाने, प्रसुतिगृहे व रुग्णालये यांचेकरीता विविध शस्त्रे उपकरणे खरेदी करणे. मान्य तरतूद रक्कम रूपये ३,५०,००,००० /- पैकी र.रुपये ४,५०,०००/-.**

विषय क्रमांक :- १२०० त्वर्य

प्रभाग क्रमांक ५७ ब मधील पुणे महानगरपालिकेच्या मा.हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखान्यासाठी एक्स-रे मशिन विथ कॉम्प्युटेड रेडिओग्राफी सिस्टिम खरेदी करणे. ( टेंडर क्रमांक ३२ सन २०१६-१७ ) अन्वये बी-२ पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या असता एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.चित्रा सेल्स ॲन्ड सर्व्हिस यांचेकडून X – Ray machine with Computed Radiography System ( A.C.1 Ton, Chest stand,Lead Apron – 2 Nos. Electrification for machine installation, Chairs – 2 Nos.Table – 1 No.Trolley for C.R.- 2 kva UPS – 1 No. Civil work for installation of X- Ray Machine ( As Per A.E.R.B. Norms ) इत्यादी बाबींसह प्रती नगाप्रमाणे रक्कम रूपये २९,७३,७२३/- (अक्षरी रक्कम रूपये एकोणतीस लाख त्र्याहत्तर हजार सातशे तेवीस फक्त ) पर्यंत प्रभाग क्रमांक ५७ ब मधील पुणे महानगरपालिकेच्या मा.हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखान्यासाठी एक्स-रे मशिन विथ कॉम्प्युटेड रेडिओग्राफी सिस्टिम खरेदी करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करण्यास आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४९० दि. ३/९/२०१६ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१६-१७, **CE 17 A 244 /SJ8-7, प्रभाग क्रमांक ५७ ब मधील म.न.पा.दवाखान्यासाठी विविध मशिन खरेदी करणे, मान्य तरतूद रक्कम रूपये ४२,५०,००० /-पैकी २९,७३,७२३/-**

**विषय क्रमांक :– १२०१ त्वर्य**

नाना वाडा या दगडी बांधकामातील ऐतिहासिक वास्तु व परिसरातील धोकादायक भागाची डागडुजी, दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विशाल ॲन्ड आकाश असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९९,८६६=५४ पेक्षा २१.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,०४,८९५=७७ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/४९१ दि. ३/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२०२ त्वर्य**

प्रभाग क्र. ४६ अ रामटेकडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे प्रस्तावित जागेवर सिमाभिंत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.सद्‌गुरुकृपा डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५१,४८,४५७/– पेक्षा २२.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०,१४,२५१=९२ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/४९२ दि. ३/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२०३ त्वर्य**

प्रभाग क्र. ५५ वडगांव नाल्यामध्ये गंगा येथील सोसायटी सिंहगड रोड ते कॅनोल पर्यंत व वडगाव परिसरात मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे, कमलादेवी हॉस्पिटल वडगाव फाटा ते अमरज्योत मित्र मंडळापर्यंत ड्रेनेज लाईनचे अर्धवट काम पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सावी इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲन्ड प्रॉपर्टिज प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४३,९९,९८६/– पेक्षा ३०.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०,६६,७९०=२४ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/४९४ दि. ६/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२०४ त्वर्य**

Design, Build, Finance, Operate, Maintain & Transfer the project of Implementation of high impact street light by installing Energy Efficiency dimmable LED street lights along with Feeder basic SCADA system (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेडर्सपैकी ठेकेदार टाटा प्रोजेक्टस् लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून ५१ टक्के Energy Efficiency प्राप्त करण्यास व त्यानून १.५ टक्का शेअर पुणे मनपास देण्यास व ९८.५ टक्के शेअर ठेकेदारास (विकसक) यानुसार त्यांचेकडून निविदा अटी शर्तीनुसार १२ वर्षे कालावधीसाठी काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/४९५ दि.६/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२०५ त्वर्य**

शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सव २०१६ निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे टेंडर न काढता आयोजन करणेस व सहभागी कलाकारांना/संस्थांना व कलाकारांनी स्वत: सुचविलेल्या नावांवर आरटीजीएसमार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर मानधन अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/बालगंधर्व/४९८ दि.६/९/२०१६ चे पत्र.

१) मा.स्थायी समिती ठराव क्र. ४४९ दि. १४/६/२०१६ अन्वये यापूर्वीच ठराव पारित झालेला आहे. त्याच धर्तीवर मनपा अधिनियम १९४९ चे शेडयूल चॅप्टर ५(२)(२) नुसार मा.महापालिका आयुक्त यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार, मा.महापौर, पुणे यांनी शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सव २०१६ निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन शनिवारवाडा पटांगण येथे दि. ११ ते १३ सप्टेंबर २०१६ अखेर करणेस व शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सवासाठी टेंडर प्रक्रिया न राबविता कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या कलाकार/संस्थांना व कलाकारांनी स्वत: सुचविलेल्या नावांवर मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रातील तक्त्यात नमूद केलेल्याप्रमाणे आरटीजीएस मार्फत त्यांच्या बँक खात्यावर मानधन अदा करणेस

२) सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आवश्यक असणारी लाईट व ध्वनी व्यवस्था ही कार्यक्रम सादर करणाऱ्या संस्थेकडेच असल्याने संस्थेने/कलाकारांनी आणून वापरल्यास त्यांचे मानधन तसेच लाईट व ध्वनी व्यवस्था खर्चाचे मानधन आरटीजीएस मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर अदा करणेस

३) मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रातील तक्त्यात नमूद केलेल्या कलाकारांपैकी एखादा कलाकार उपस्थित न राहील्यास त्याच दर्जाचा व मानधनाचा दुसऱ्या कलाकारास सहभागी करुन घेणेस

४) शनिवारवाडा महोत्सव समितीमध्ये स्थानिक नगरसेवकांना सहभागी करुन घेण्यास

**विषय क्रमांक :– १२०६ त्वर्य**

Operation, maintenance and segregation of mixed waste, disposal of organic and in-organic waste having capacity of 15 MTPD near dudh-bhatti including civil work and Operation, maintenance work for period of 3 years.(B2-TYPE) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.श्री.समर्थ कंस्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून देखभाल व दुरुस्तीसाठी र.रुपये ३९०/– प्रती मे.टन सर्व करांसहीत व पुढील दरवर्षी १०% वाढ (तडजोडीने) म्हणजेच पहिले वर्षासाठी र.रुपये ३९०/– प्रती मे.टनाप्रमाणे र.रुपये २१,३५,२५०/–, दुसरे वर्षासाठी र.रुपये ४२९/– प्रती मे.टनाप्रमाणे र.रुपये२३,४८,७७५/–, तिसरे वर्षासाठी र.रुपये ४७१.९० प्रती मे.टनाप्रमाणे र.रुपये २५,८३,६५२=५० असे एकूण मिळून रुपये७०,६७,६७७=५० (अक्षरी र.रुपये सत्तर लाख सदूसष्ट हजार सहाशे सत्याहत्तर पैसे पन्नास) रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/४९९ दि.६/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२०७ त्वर्य**

पुणे महानगर परिवहन महामंडळास २०० मिडी बसेस खरेदीसाठी निधी वर्ग करणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र.१ व २ च्या ठरावान्वये १०० बसेस खरेदीसाठी मान्यता देण्यात आली आहे. तथापी पीएमपीएमएलने केलेल्या मागणीनुसार १०० स्टॅन्र्डड बसेस ऐवजी २०० मिडी बसेस खरेदीकामी निधी उपलब्ध होणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. व सदर बसेस खरेदीसाठी र.रू.३० कोटीची मागणी केली आहे. सन २०१६–२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये पीएमपीएमएल बस खरेदीसाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये CE 20B 102/ST2-43 (केंद्र शासनाच्या स्पेसिफिकेशननुसार युरो ४ सी.एन.जी बसेस घेणे) या अर्थशिर्षकावर र.रू.४० कोटी ऐवढी तरतूद उपलब्ध करण्यात आली होती तथापी अंदाजपत्रकामध्ये १५% वजावट जावून र.रू.३४ कोटी ऐवढी तरतूद आहे.

तसेच सदर प्रस्तावातील बस खरेदी पीएमपीएमएलने न करता महानगरपालिकेच्या वतीने करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/५०० दि.६/९/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२०८ त्वर्य**

मा.सुनिल गोगले, मा.फारुक इनामदार, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.सौ.सुमन पठारे, मा.सौ.आरती बाबर, मा.श्रीकांत जगताप, मा.राजेंद्र शिळीमकर, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.मुक्ता टिळक व मा.श्रीमती सुशिला नेटके यांचे दि.६/९/२०१६ चे पत्र.

पुणे शहरात डेंग्यू,मलेरिया,चिकुनगुनिया या आजाराने थैमान घातले असून या रोगांवर पुणे महानगरपालिकेच्या दवाखान्यात मोफत उपचार व मोफत वैद्यकिय चाचण्या करण्यास तसेच पुणे महानगरपालिकेचे दवाखाने गणेशोत्सव काळात रात्री ९ वाजे पर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १२०९ त्वर्य**

मा.सौ.मुक्ता टिळक व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि.६/९/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयामध्ये सॅनेटरी नॅपकिन डिस्पोजल मशिन बसविणेसाठी र.रु.१५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, पान क्र.५८, RE17F192 कमला नेहरु रुग्णालय येथे बंदपत्रित तज्ञ (बॉंडेड) (स्पेशालिस्ट व सुपर स्पेशालिस्ट ) डॉक्टरांच्या एकवट वेतनापोटी | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम -** पुणे महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयामध्ये सॅनेटरी नॅपकिन डिस्पोजल मशिन बसविणे. | --- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १२१० त्वर्य**

मा.सौ.अश्विनी कदम, मा.सुनिल गोगले व मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम यांचे दि.६/९/२०१६ चे पत्र.

राष्ट्रीय इंडीयन मिलेटरी कॉलेज देहराडून येथील प्रशिक्षिणासाठी देशातून २५ विद्यार्थ्यांची निवड झाली असून महाराष्ट्रातुन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणारा पुणे शहरातील विद्यार्थी अभिमान्यु दशरथ घोरपडे याची निवड झालेली आहे.

सदर कॉलेजचे विद्यार्थी भविष्यामध्ये N.D.A. येथे पुढील प्रशिक्षण घेवून संरक्षण दलामध्ये उच्च अधिकारी होतात.

अभिमान्यु घोरपडे याचे देहराडुन येथील शिक्षण इयत्ता ८ वी ते १२ पर्यंत असून शिक्षणाचा वार्षिक खर्च अंदाजे र.रुपये ९०,०००/- प्रमाणे एकुण ५ वर्षासाठी एकुण र.रु.५ लाख खर्च होणार आहे.

अभिमान्यु घोरपडे याची आर्थिक परिस्थिती बेताची असलेने शिक्षणासाठी खर्च करणे आवाक्याबाहेरचा आहे.

तरी पुणे शहरातील एकमेव निवड झालेला विद्यार्थी अभिमान्यु घोरपडे यास पुढील शिक्षणासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे र.रु.२,९०,०००/-इतकी आर्थिक मदत देण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्रमांक :- १२११ त्वर्य**

मा.गणेश बिडकर यांचे दि.६/९/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.३९ ब मध्ये घरांक ५७० रास्ता पेठ इंद्रप्रस्थ परिसर गल्लीबोळात विविध कॉंक्रिट करणे, फुटपाथ दुरुस्ती करणे व तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रू.१५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ११, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र. २२७, अ.क्र.४६, प्रभाग क्र. ३९ ब गणेश पेठ दुधभट्टी नव्याने बांधकाम करण्याचे काम सुरु आहे त्याकरिता रंगकाम करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | १५ लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम** प्रभाग क्र.३९ ब मध्ये घरांक ५७० रास्ता पेठ इंद्रप्रस्थ परिसर गल्लीबोळात विविध कॉंक्रिट करणे, फुटपाथ दुरुस्ती करणे व तद्नुषंगिक कामे करणे | --- | १५ लाख |

**विषय क्रमांक :- १२१२ त्वर्य**

मा.गणेश बिडकर यांचे दि.६/९/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.३९ ब मध्ये विविध ठिकाणी, सोमवार पेठ, १५ ऑगस्ट चौक परिसर या ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रिट करणे, फरशी बसविणे व तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. २, शहरामध्ये पाण्याच्या टाक्या बांधणे / बोअरवेल घेणे, (यादी क्र. एसपी३), पान क्र.४५, अ.क्र.१८, प्रभाग क्र. ३९ ब मध्ये विविध ठिकाणी बोअरवेल निर्माण करणे व दुरुस्त करणे जुन्या विहिरीमधील गाळ काढून नागरिकांकरिता पाण्याची व्यवस्था करणे व तद्नुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम** प्रभाग क्र.३९ ब मध्ये विविध ठिकाणी, सोमवार पेठ, १५ ऑगस्ट चौक परिसर या ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रिट करणे, फरशी बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :– १२१३ त्वर्य**

मा.गणेश बिडकर यांचे दि.६/९/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.३९ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०४, अ.क्र. ४०, शहरामधील विविध भवनांमध्ये विद्युतविषयक कामे करणे, (यादी क्र. एसबी ८), पान क्र.२११, अ.क्र.१६, प्रभाग क्र.३९ ब मध्ये सोमवार पेठ, पुरातन नागेश्वर मंदिर (पुरातत्व विभाग, पुणे मनपा) यांच्या वतीने काम सुरु आहे तेथे विद्युत विषयक कामे करणे व तद्नुषंगिक कामे करणे | २५ लाख | --- |
| | **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १ | प्रभाग क्र.३९ ब मध्ये विविध ठिकाणी स्टिलचे बाकडे (ज्येष्ठ नागरिकांना बसण्याकरिता) बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.३९ ब मध्ये १५ ऑगस्ट चौक, भोलागीर शाळा येथील गल्लीबोळात सिमेंट कॉंक्रिट करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | १० लाख |
| ३ | प्रभाग क्र.३९ ब मध्ये वृक्ष छाटणीसाठी गार्डन विभागातर्फे मजूर पुरविणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | ०५ लाख |

**विषय क्रमांक :– १२१४ त्वर्य**

मा.महापौर,मा.उपमहापौर,मा.विरोधी पक्षनेते, मा.सभागृह नेता, मा.गटनेते म.न.से., मा.गटनेते शिवसेना, मा.गटनेते भा.ज.पा., मा.गटनेते आर.पी.आय. यांचे कार्यालयात व मा. स्थायी समिती, शहर सुधारणा समिती,महिला बाल कल्याण समिती सभाप्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले होते. त्याप्रित्यर्थ संबंधित बिलधारकाने बिले सादर केली असून संबंधित अर्थशिर्षकावर बिले खर्ची टाकून संबंधितास बिले अदा करणेस तसेच मा.महापौर यांचे ऐच्छिक खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ३३४९ दि.६/९/२०१६ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**